माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
बृहन्मुंबई खंडपीठ
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

रामाआ-तक्रार क्र.बीएम-१६२ ते १८६/२०२१ (२५ तक्रारीं)

अपिलार्थी श्री. इक्बाल आर खान

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता-१ व २
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, कार्यकारी अभियंता (शहर) यांचे कार्यालय,
रुम नं.५३९, ४ था मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, कार्यकारी अभियंता (शहर) यांचे कार्यालय,
रुम नं.५३९, ४ था मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

द्वितीय अपील आदेश दिनांक	तक्रार दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याकडून मागविण्यात आलेल्या अहवाल पत्र दिनांक	जन माहिती अधिकाऱ्यांचा अहवाल दिनांक
-	०६.०५.२०२१	२८.१२.२०२१/२७.०३.२०२६	२०.०४.२०२६

तक्रारकर्त्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये आयोगाकडे दि. ०६.०५.२०२१ रोजी एकूण २५ तक्रारी दाखल केल्या आहेत.

२. सदर तक्रारींत त्यांनी असा उल्लेख केला आहे की ,माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता-१ व २, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, मुंबई यांच्याकडे २५ स्वतंत्र माहिती अर्ज सादर करुन माहितीची मागणी केली होती. त्यांस अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी स्वतंत्ररित्या उत्तर दिले असून दिलेल्या उत्तराने अनुषंगाने मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाच्या संकेतस्थळाची पाहणी केली असता या संकेतस्थळावर कलम ४ ची संपूर्ण माहिती सार्वजनिक रुपाने प्रकाशित केली असता या संकेतस्थळावर कलम ४ ची संपूर्ण माहिती सार्वजनिक रुपाने प्रकाशित केली नसून फक्त यादी उपलब्ध करण्यात आली आहे. सदर उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी आयोगास सदरहू थेट तक्रार अर्ज सादर केला आहे.

तसेच त्यांनी असेही नमूद केले आहे की, यादीप्रमाणे प्रत्येक कामाची माहिती मिळण्यासाठी प्रत्येक कामाचे स्वतंत्र माहितीचा अधिकार अर्ज दाखल केला असता जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रत्येक कामाच्या माहितीचे सुधारित उत्तर न देता सर्व २५ अर्जाचे उत्तर एका पत्रामध्ये गोळा करुन असमाधानकारक व उडवाउडवाची उत्तर नमूद करुन जाणुनबुजून दिशाभूल करणारी पत्र पाठविण्यात आली असून सदर माहिती देण्यास टाळाटाळ केली असून त्यांची दिशाभूल केली आहे. तरी, संबंधितांवर अधिनियमानुसार कारवाई करावी व माहिती उलपब्ध करुन द्यावी, अशी विनंती केली आहे.

..२/-

३. उक्त तक्रारींच्या अनुषंगाने संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता-१ व २ यांच्याकडून दि.२८.१२.२०२१ च्या पत्रान्वये अहवाल मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता-१ व २ यांच्याकडून अहवाल प्राप्त न झाल्याने त्यांना पुन्हा दि.२७.०३.२०२६ रोजी स्मरणपत्र देवून दि.२०.०४.२०२६ पर्यंत आयोगास केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यास सांगितले होते. त्यास अनुसरुन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता-१ व २, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ यांनी आयोगास दि.२०.०४.२०२६ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला असून त्याद्वारे त्यांनी असे नमूद केले आहे की, " तक्रारदार यांचे मा. आयोगास लिहिलेले पत्र या कार्यालयास प्राप्त झाले असून सदर पत्र प्राप्त झाल्यानंतर तक्रारकर्ता यांना कार्यालयात बोलावून संपूर्ण माहिती त्यांना म्हाडाच्या संकेतस्थळावर दाखविण्यात आली. तसेच सदरची माहिती मला Pen drive मध्ये देण्यात आली आहे. सदर माहितीवरुन त्यांचे समाधान झाले व आता त्यांना कोणतीही तक्रार नाही असे त्यांनी कार्यालयास कळविले आहे. सदरचे पत्र आपल्या माहितीसाठी या पत्रासोबत सादर करण्यात येत आहे."

तक्रारकर्ता यांच्या पत्रात असे नमूद केले आहे की, " मी इक्बाल आर खान दि.०६.०५.२०२१ च्या पत्रान्वये आयोगास मुं.झो.सु.मंडळाची माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली नाही अशा स्वरुपाची तक्रार केली होती. आता मला कार्यालयात बोलावून सदरची संपूर्ण माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असल्याचे दाखविण्यात आली आहे. तसेच सदरची माहिती मला Pendrive मध्ये देण्यात आली आहे. सदरची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असल्याने माझे समाधान झाले आहे व सादर केलेल्या २५ तक्रार अर्जांबाबत माझी कोणतीही तक्रार नाही. आपणांस विनंती करण्यात येते की, सदरची बाब मा. राज्य माहिती आयोगाच्या अवलोकनार्थ सादर करावी व माझे सर्व अर्ज निकाली काढण्याबाबत आयोगास विनंती करावी ही विनंती"

४. या तक्रार अर्जासंदर्भातील वरील परि. क्र.३ मध्ये नमूद केलेली तक्रारकर्ता यांची तक्रार मागे घेण्याची विनंती मान्य करुन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

आदेश

उपरोक्त विवेचनासह २५ तक्रारीं निकाली काढण्यात येत आहेत.

State Information Commission ★ Greater Mumbai ★ सत्यमेव जयते

17-7-2026

(डॉ. प्रदीप व्यास)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

मुंबई
दिनांक : १७.०७.२०२६